order of stay of civil or criminal proceedings is produced, may fix a date not beyond six months of the order of stay so that on expiry of period of stay, proceedings can commence unless order of extension of stay is produced. "

यास्तव या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना असे कळविण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार ज्या प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाने अतिक्रमण निर्मुलनाबाबत स्थगिती आदेश देऊन सहा महिनेपेक्षा जास्त कालावधी उलटूनसुध्दा काही निर्णय झाले नाहीत, अशा प्रकरणी मा सर्वोच्च न्यायालयाचे सदर आदेश मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

सदर परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे.

(विनीत अग्रवाल)
अपर पोलीस महासंचालक तथा
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

प्रति,
मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ मंडळ.
मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.
मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.
मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

प्रत- मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहीतीसाठी सादर
प्रत- उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा. यांना माहीतीसाठी

जा.क्र.मुदवसुअ/प्रा/परिपत्रक/ १५१ /२०२४
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्राधिकरण, मुंबई
दि. 14/02/2024

मुं. गृ. नि. व क्षे. वि. मंडळ
आवक क्र. ET-540
दिनांक 14/02/2024

## दक्षता विभागाचे परिपत्रक -१०

विषय- अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यासाठी जारी केलेल्या नोटीसवर मा.न्यायालयाने दिलेल्या स्थगिती आदेशांबाबत.

म्हाडाच्या अखत्यारितील मोकळे भुखंड तसेच म्हाडाने वितरीत केलेल्या सदनिका येथे सतत अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम होत असते. याबाबतच्या तक्रारी संबंधीत कार्यालय तसेच या कार्यालयास प्राप्त होत असतात.

तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कार्यकारी अभियंता किंवा संबंधित मिळकत व्यवस्थापक यांचेकडून अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम करणा-या व्यक्तीस नोटीस जारी केली जाते. नोटीस जारी झाल्यानंतर अतिक्रमण करणारी व्यक्ती मा. न्यायालयात दाद मागते व काही प्रकरणी मा. न्यायालयाकडून स्थगिती आदेश देण्यात येतात.

प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्यानंतर तसेच मा. न्यायालयाने स्थगिती आदेश दिल्यानंतर अतिक्रमण निर्मुलनाची प्रक्रिया रखडते. यामुळे सर्व विभागीय मंडळामध्ये सदर प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने क्रिमीनल अपिल क्र. १३७५-१३७६/२०१३ च्या अनुषंगाने दि. २८.०३.२०१८ रोजी दिलेल्या आदेशातील परीच्छेद क्र. ३५ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

"In view of above, situation of proceedings remaining pending for long on account of stay needs to be remedied. Remedy is required not only for corruption cases but for all civil and criminal cases where on account of stay, civil and criminal proceedings are held up. At times, proceedings are adjourned *sine die* on account of stay. Even after stay is vacated, intimation is not received and proceedings are not taken up. In an attempt to remedy this, situation, we consider it appropriate to direct that in all pending cases where stay against proceedings of a civil or criminal trial is operating, the same will come to an end on expiry of six months from today unless in an exceptional case by a speaking order such stay is extended. In cases where stay is granted in future, the same will end on expiry of six months from the date of such order unless similar extension is granted by a speaking order. The speaking order must show that the case was of such exceptional nature that continuing the stay was more important than having the trial finalized. The trial Court where